


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : ३६२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.१२ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# आता न्याय मिळेल, सिब्बल यांच्या युक्तिवादानंतर राऊतांनी व्यक्त केला विश्वास

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, मुंबई :** शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्ह कोणाचं? यावर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने ज्येष्ठ वकिल कपिल सिब्बल यांनी युक्तीवाद केला. ज्या पद्धतीने निवडणूक आयोगाकडून एकनाथ शिंदे यांना पक्ष आणि चिन्ह देण्यात आलं, त्यावर कपिल सिब्बल यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. आजचा युक्तिवाद संपल्यानंतर खासदार संजय राऊत यांनी मोठं विधान केलं आहे. राऊत यांनी नेमकं काय म्हटलं ते सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**न्याय मिळेल असा आम्हाला विश्वास...**

निवडणुक आयोगाच्या निर्णयांवर कपिल सिब्बल यांनी आक्षेप घेतला आहे, याबाबत बोलताना राऊत यांनी म्हटले की, हे एक घटनापीठ आहे. या घटनापीठाकडे येणारे खटले हे अनेक कलमांची व्याख्या करणारे असतात. संविधानाच्या एखाद्या कलमाचा भंग झाला असेल आणि त्याच्या विरोधात निर्णय दिला असेल तर त्या संदर्भात सुनावणी होत आहे.

शिवसेनेच्या प्रकरणात पावला पावलावर संविधान आणि घटनेचा भंग झाला आहे. त्यामुळे आज कपिल सिब्बल यांनी संविधानाच्या दृष्टीने बाजू मांडली. याद्वारे त्यांनी निवडणूक आयोगाच्या निर्णयाची पिसं काढली. निवडणूक आयोगाची प्रत्येक स्टेप ही कशी चुकली, याचं विवेचन सिब्बल यांनी केलं ते ऐतिहासिक आहे. हे भविष्यातील निकालासाठी माईलस्टोन असेल असा युक्तिवाद सिब्बल यांनी खऱ्या शिवसेनेच्या आणि उद्धव ठाकरेंच्या वतीने केला. आम्ही सगळे समाधानी आहोत, आम्हाला आता न्याय मिळेल असा आत्मविश्वास वाटत आहे. आमचा कोर्टावर विश्वास आहे.

**सिब्बल यांच्या युक्तिवादावर भाष्य**

पक्षाची घटना ही असंवैधानिक आहे असं सरन्यायाधीशांनी म्हटलं, यावर तुम्ही कशाच्या आधारे घटना संवैधानिक की असंवैधानिक ठरवणार? हा मुद्दा महत्त्वाचा ठरेल असं तुम्हाला वाटतं का? या प्रश्नावर बोलताना राऊत यांनी म्हटले की, मला असं वाटत नाही. या मुद्द्यावरही कपिल



सिब्बल यांनी युक्तिवाद केला आहे. हा विषय त्यांनी समजावून सांगितलेला आहे. २०१८ साली ज्या गाईडलाईन्स निवडणूक आयोगाने दिल्या होत्या, त्याच उल्लंघन आम्ही केलेले नाही. मात्र पक्ष सोडून गेलेल्या लोकांनी त्याच उल्लंघन केलेले आहे हे आम्ही कोर्टासमोर मांडलं आहे. आपण एका ऐतिहासिक निर्णयाकडे चाललो आहे. पक्षफुटीसंदर्भात, पक्षांतर बंदी कायद्यासंदर्भात जी बजबजपुरी या देशात माजलेली आहे, त्या दृष्टीने हे घटनापीठ ऐसिहासिक निर्णय देईल अशी आशेची किरणं आज तरी आम्हाला दिसत आहेत.

**आम्हाला आशेचा किरण दिसत आहे...**

कपिल सिब्बल यांनी पक्षचिन्ह आणि पक्ष दिसऱ्या व्यक्तीला देण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला नाही असाही युक्तिवाद केला. यावर बोलताना राऊत यांनी म्हटले की, हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा सिब्बल यांनी मांडला. तो अधिकार निवडणूक आयोगाला नाही. सिब्बल यांनी सेक्शन २९ मधील मुद्दे न्यायालयासमोर आणले आहेत. देशात झालेली चुकीची पक्षांतरे त्यांनी समोर आणली आहेत. त्यामुळे एक आशेचा किरण आम्हाला दिसत आहे.

# पावसाळ्यातही पाणीटंचाई; पनवेलकरांचा संताप वाढला, कायमस्वरूपी उपाययोजनेची मागणी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, पनवेल :** पावसाळा सुरू होऊन अनेक दिवस उलटूनही पनवेल शहरासह कळंबोली, रोडपाली, कामोठे आणि परिसरातील नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. गेल्या सुमारे १५ दिवसांपासून अनेक भागांमध्ये पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या परिसराला दररोज सुमारे ३० एमएलडी (मिलियन लिटर प्रतिदिन) पाण्याची आवश्यकता असताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून (MJP) केवळ १५ ते १६ एमएलडी पाणीपुरवठा होत आहे. परिणामी अनेक गृहनिर्माण संस्था, इमारती आणि वसाहतींमध्ये पाण्याचे गंभीर संकट निर्माण झाले आहे.

प्रशासनाकडून तात्पुरत्या स्वरूपात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न सुरू असला तरी नागरिकांचा प्रश्न कायम आहे. टँकर हा उपाय नसून केवळ तात्पुरती सोय आहे. आम्हाला कायमस्वरूपी आणि नियोजनबद्ध पाणीपुरवठा हवा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

पनवेल शहर आणि ग्रामीण भागात वाढत्या




पाणीटंचाईमुळे खासगी पाणी विक्रीचा व्यवसायही वाढताना दिसत आहे. काही भागांमध्ये नागरिकांना पिण्याचे पाणीही विकत घ्यावे लागत असल्याचे चित्र आहे. अनेक गृहनिर्माण संकुलांमध्ये नियमित पाणीपुरवठा होत नसताना, पाणी विक्री करणाऱ्या व्यावसायिकांकडे मात्र मुबलक पाणी उपलब्ध असल्याने नागरिकांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

दरम्यान, घर खरेदी करताना बिल्डरांकडून ग्राहकांना २४ तास पाणी, अत्याधुनिक सुविधा, दर्जेदार नागरी व्यवस्था आणि उत्तम जीवनमानाची आश्वासने दिली जातात. मात्र प्रत्यक्षात अनेक रहिवाशांना पाणी, रस्ते आणि इतर मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. त्यामुळे लाखो रुपये खर्च करून घरे खरेदी केलेल्या नागरिकांमध्ये निराशेची भावना निर्माण झाली आहे.

पनवेलमधील काही भाग सिडकोच्या तर काही भाग पनवेल महानगरपालिकेच्या अखत्यारीत येत असल्याने नागरिकांसमोर तक्रार नेमकी कुठे करायची, हा देखील मोठा प्रश्न उभा राहतो. विभागीय अधिकारांच्या गोंधळामुळे अनेक समस्या दीर्घकाळ प्रलंबित राहतात, अशी नागरिकांची तक्रार आहे.

पाणीटंचाईबरोबरच अनेक भागांतील रस्त्यांची दुरवस्था, अपुरी नागरी सुविधा आणि नियोजनाचा अभाव यामुळे पनवेलच्या झपाट्याने वाढणाऱ्या नागरीकरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. वाढत्या लोकसंख्येनुसार पायाभूत सुविधांचे नियोजन करण्यात प्रशासन आणि विकास यंत्रणा अपयशी ठरत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

पनवेलकरांना आता आश्वासनांची नव्हे, तर ठोस आणि कायमस्वरूपी उपाययोजनांची अपेक्षा आहे. पावसाळ्यातही पाणीटंचाईची समस्या कायम राहिल्यास नागरिकांचा संताप आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# शरद पवार गटाच्या खासदारांनी घेतली पंतप्रधानांची भेट !



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, अहिल्यानगर :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या लोकसभेतील गटनेत्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची संसद भवनात सदिच्छा भेट घेतली. यावेळी पंतप्रधानांना छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती आणि ऋमहात्मा फुले' पगडी भेट देण्यात आली.

या भेटीदरम्यान अहिल्यानगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांनी मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी पंतप्रधान मोदींना विविध मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर केले. अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकरी व युवकांच्या विकासासाठी केंद्र सरकारने या सर्व मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा खासदार निलेश लंके यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी खासदार सुप्रिया सुळे,डॉ अमोल कोल्हे, निलेश लंके, सुरेश म्हात्रे, धैर्यशील मोहिते पाटील,अमर काळे व बजरंग सोनवणे उपस्थित होते.

दरम्यान खासदार निलेश लंके यांनी केंद्रीय सशस्त्र पोलीस दलातील (सीएपीएफ) अनेक वर्षांपासून देशाच्या सुरक्षेसाठी अत्यंत प्रतिकूल आणि आव्हानात्मक परिस्थितीत सेवा बजावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काचा न्याय मिळावा, यासाठी केंद्र सरकारने तातडीने हस्तक्षेप करावा. तसेच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या स्पष्ट निर्देशांची विलंब न करता प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे.

# नाईटलाईफ की बेकायदा धंद्यांचा अड्डा?
# विमाननगरमध्ये कारवायांची मालिका सुरूच !

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.११, विमाननगर (पुणे) :** आयटी हब, भव्य मॉल्स आणि उच्चभ्रू वस्ती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विमाननगरची ओळख आता गुन्हेगारी आणि बेभान नाईटलाईफचे केंद्र म्हणून होऊ लागली आहे.

रात्री उशिरापर्यंत सुरू असणारे अनधिकृत पब, थिरकणाऱ्या पार्ट्या, पार्किंगमधील रक्तरंजित राडे आणि मसाज पार्लरच्या नावाखाली चालणारे काळे धंदे... यांमुळे विमाननगर पूर्णपणे हादरले आहे.

नुकतीच ‘बॅकस्टेज लाउंज अँड बार’च्या पार्किंगमध्ये एका ३७ वर्षीय व्यक्तीला ५ जणांनी बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. पब आणि लाउंजमध्ये सुरु होणारे वाद थेट पार्किंगमध्ये येऊन हाणामाऱ्यांपर्यंत पोहोचत आहेत. नागरिकांच्या आणि ग्राहकांच्या सुरक्षेची धिंडवडे निघत असताना पब चालक आणि पोलीस प्रशासन नेमके काय करत आहे?

केवळ मारामाऱ्याच नाही, तर पबचालकांनी नियमांची पार पायम



ल्ली केली आहे. ‘द हौज कम्युन’ सारख्या पबवर पोलिसांनी टाकलेले छापे आणि पहाटेपर्यंत चालणाऱ्या पार्ट्यांमध्ये सापडलेली तरुण-तरुणींची गर्दी यावरून विमाननगरमध्ये सर्रास वेळेचे नियम धाब्यावर बसवले जात असल्याचे स्पष्ट होते.

**मसाज पार्लरच्या आडून भयंकर प्रकार!**

पब संस्कृतीसोबतच मसाज पार्लरच्या कारवायांनी विमाननगरमधील कायदा अन् सुव्यवस्थेचे तीन-तेरा वाजवले आहेत. फेब्रुवारी २०२६ मध्ये ‘द रूट्स स्पा’वर टाकलेल्या छाप्यादरम्यान एका महिलेने इमारतीवरून उडी मारून प्राण गमावला, तर मॅनेजर गंभीर जखमी झाला.

या प्रकरणाच्या गांभीर्यामुळे थेट CID चौकशीची वेळ आली. याआधीही एकाच छाप्यात तब्बल १६ महिलांची सुटका करण्यात आली होती. स्पा आणि मसाज सेंटरच्या नावाखाली विमाननगरमध्ये चालणारे गैरप्रकार नक्की कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहेत?

**परवान्यांची झाडाझडती घेण्याची वेळ!**

विमाननगरमधील पब, बार, रूफटॉप लाउंज आणि स्पा सेंटरचे परवाने, सुरक्षेची उपाययोजना, सीसीटीव्ही व्यवस्था आणि वेळेचे पालन यांची सखोल झाडाझडती घेणे अत्यंत गरजेचे झाले आहे.

या रोजच्या त्रासाला कंटाळलेले नागरिक आता संतप्त सवाल विचारत आहेतविमाननगरच्या या बेभान नाईटलाईफवर लगाम लावण्यास विमाननगर पोलीस असमर्थ ठरत आहेत की गुन्हेगारांना प्रशासनाचा कसलाच धाक उरलेला नाही? जर वेळीच कठोर पावले उचलली गेली नाहीत, तर शांतताप्रिय विमाननगर पूर्णपणे गुन्हेगारीच्या विळख्यात अडकल्याशिवाय राहणार नाही असा सवाल नागरिकांनी उपस्तिथ केला आहे.

# दुर्गापूरच्या शक्तीनगर परिसरात वडिलांनेच केला दोन मुलांवर शस्त्राने हल्ला !

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.११,चंद्रपूर : सोमवारी रात्री उशिरा दुर्गापूरच्या शक्तीनगर कॉलनीत एक भीषण घटना घडली, ज्यामुळे संपूर्ण परिसर हादरला आहे. एका वडिलांवर आपल्या दोन निष्पाप मुलांच्या मानेवर धारदार शस्त्राने हल्ला केल्याचा आरोप आहे. या क्रूर हल्ल्यात अंदाजे ७ वर्षांचा धाकटा मुलगा देवांश बदखल याचा मृत्यू झाला, तर ११ वर्षांचा मोठा मुलगा गंभीर जखमी झाला आहे. मोठ्या मुलावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी आरोपी वडील, मंगेश बदखल याला अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगेश बदखल हा वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (डब्ल्यूसीएल) च्या चंद्रपूर भागातील क्वार्टर क्रमांक एम-२९ मध्ये, त्याचा भाऊ राहुल बदखल याच्यासोबत आपल्या दोन मुलांसह राहत होता. मिळालेल्या माहितीनुसार, कौटुंबिक वादामुळे काही महिन्यांपूर्वी मंगेशची पत्नी घर सोडून गेली होती. त्यानंतर आपल्या दोन मुलांचे पालनपोषण करण्यासाठी मंगेश ऑटो-रिक्षा चालवत होता. मिळालेल्या माहितीनुसार, तो आपल्या पत्नीला घरी परत आणण्याचे वारंवार प्रयत्न करत होता, परंतु त्याला यश आले नाही. यामुळे तो मानसिक तणावाखाली होता. मंगेश भारत बदखल (४९) असे संशयित आरोपी पित्याचे नाव असून, देवांश मंगेश बदखल (८) असे मृत मुलाचे, तर रुद्रांश मंगेश बदखल (१२) असे गंभीर जखमी मुलाचे नाव आहे. जखमी रुद्रांशवर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मात्र, त्याने स्वतःच्या मुलांवर केलेल्या जीवघेण्या हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे. सोमवारी रात्री उशिरा घडलेल्या या घटनेत दोन्ही मुले गंभीर जखमी झाली. घटनेची माहिती मिळताच कुटुंबीय आणि स्थानिक रहिवासी घाबरले. जखमी मुलांना उपचारासाठी तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासणीनंतर देवांश बदखल यांना मृत घोषित केले, तर मोठा मुलगा गंभीर अवस्थेत असून त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. स्वतःच्या वडिलांनीच निष्पाप मुलांवर केलेल्या कथित जीवघेण्या हल्ल्याची बातमी पसरताच शक्तीनगर कॉलनीत खळबळ उडाली. मुलांच्या सुरक्षेची आणि संगोपनाची जबाबदारी असलेल्या वडिलांवरच स्वतःच्या मुलांवर हल्ला केल्याचा आरोप झाल्याने परिसरात तीव्र संताप आणि अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले




## हत्ती वाचवा, पर्यावरण वाचवा!

१२ ऑगस्ट हा दिवस जगभर जागतिक हत्ती दिन म्हणून साजरा केला जातो. हत्तींच्या संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा मानला जातो. जागतिक हत्ती दिनाची अधिकृत सुरुवात १२ ऑगस्ट २०१२ रोजी झाली. आशियाई आणि आफ्रिकन हत्तींसमोरील वाढते धोके, अधिवासाचा ऱ्हास, हस्तिदंतासाठी होणारी अवैध शिकार आणि मानव-हत्ती संघर्ष याकडे जगाचे लक्ष वेधणे हा या दिवसाचा प्रमुख उद्देश आहे.

हत्ती हा केवळ जंगलातील एक मोठा प्राणी नाही, तर तो जंगलाच्या परिसंस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. त्याच्या हालचालींमुळे जंगलातील वनस्पतींची रचना बदलते, बिया दूरवर पोहोचतात, काही झाडांच्या पुनरुत्पादनाला मदत होते आणि जंगलात नैसर्गिक वाटा निर्माण होतात. त्यामुळे हत्तींचे अस्तित्व हे अनेक वनस्पती आणि इतर वन्यजीवांच्या अस्तित्वाशी जोडलेले आहे.

मात्र आज हत्तींसमोर अनेक गंभीर संकटे उभी आहेत. हस्तिदंतासाठी होणारी अवैध शिकार, जंगलतोड, अधिवासाचे तुकडीकरण आणि वाढता मानव-हत्ती संघर्ष यामुळे हत्तींच्या संवर्धनाचे आव्हान अधिक गंभीर झाले आहे. जंगलांचे क्षेत्र कमी होत असताना हत्तींचा नैसर्गिक अधिवासही आकुंचन पावत आहे. परिणामी अनेक ठिकाणी हत्ती आणि मानवी वस्त्यांमध्ये संघर्ष निर्माण होतो. हा संघर्ष केवळ वन्यजीवांसाठी नव्हे, तर स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेसाठीही चिंतेचा विषय आहे.

हत्तींच्या पर्यावरणीय भूमिकेबाबत झालेले संशोधनही महत्त्वपूर्ण आहे. छर्रीॲश त्र्शीलळशपलश मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका संशोधनानुसार मध्य आफ्रिकेतील जंगलांमध्ये हत्तींच्या हालचालींमुळे झाडांची संख्या व रचना बदलते आणि मोठ्या, अधिक घनतेच्या लाकडाच्या झाडांना वाढण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण होऊ शकते. या प्रक्रियेमुळे जंगलातील जमिनीवरील जैवभार आणि कार्बन साठवणूक वाढण्यास मदत होऊ शकते. संशोधनानुसार वनहत्तींचे पूर्णतः नामशेष होणे मध्य आफ्रिकेतील वर्षावनांच्या जमिनीवरील जैवभारात सुमारे ७ टक्क्यांची घट घडवू शकते.

यावरून एक गोष्ट स्पष्ट होते हत्तींचे संरक्षण म्हणजे केवळ एका प्राण्याचे संरक्षण नव्हे; ते संपूर्ण जंगलव्यवस्थेचे संरक्षण आहे. हत्तींची संख्या घटली तर त्याचा परिणाम जैवविविधतेवर आणि जंगलाच्या पर्यावरणीय प्रक्रियांवर होऊ शकतो.

म्हणूनच हत्तींच्या संरक्षणासाठी केवळ एक दिवस जनजागृती करून चालणार नाही. अवैध शिकार आणि हस्तिदंताच्या बेकायदेशीर व्यापारावर कठोर नियंत्रण आवश्यक आहे. हत्तींचे नैसर्गिक अधिवास सुरक्षित ठेवणे, जंगलांचे संवर्धन करणे आणि मानव-हत्ती संघर्ष कमी करण्यासाठी वैज्ञानिक व स्थानिक पातळीवरील उपाययोजना करणे गरजेचे आहे. वन्यजीव संरक्षण कायद्यांची प्रभावी अंमलबजावणीही तितकीच महत्त्वाची आहे.

सरकार, वनविभाग, पर्यावरण संस्था आणि स्थानिक नागरिक यांनी एकत्रितपणे काम केले तरच हत्तींचे संवर्धन अधिक प्रभावीपणे होऊ शकते. शाळा-महाविद्यालयांमध्येही वन्यजीव आणि पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती वाढवली पाहिजे.

आज हत्ती वाचवण्याचा प्रश्न केवळ वन्यजीवप्रेमींचा राहिलेला नाही. तो आपल्या पर्यावरणाच्या भवितव्याचा प्रश्न आहे. जंगल वाचले तर जैवविविधता वाचेल आणि जैवविविधता वाचली तर पर्यावरणाचे संतुलन टिकेल.

हत्ती वाचवा; जंगल वाचवा!
जंगल वाचवा; पर्यावरण वाचवा!

**- श्याम ठाणेदार**

# ज्यांनी भारताला केवळ राज्यघटना नाही, तर माणूसपण दिले!



एखाद्या देशाची राज्यघटना म्हणजे केवळ कलमांचा संग्रह असतो का? की ती त्या देशाच्या स्वप्नांची, संघर्षांची आणि भविष्यातील वाटचालीची दिशा असते? भारताच्या संदर्भात या प्रश्नाचे उत्तर शोधताना एक नाव निर्विवादपणे समोर येते, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर! २९ ऑगस्ट १९४७ रोजी संविधान सभेने मसुदा समितीची स्थापना केली आणि तिच्या अध्यक्षपदाची जबाबदारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर सोपवली. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या, मात्र जात-विषमता आणि सामाजिक अन्यायाने पोखरलेल्या देशासाठी राज्यघटना तयार करण्याचे काम हे साधे कायदेलेखन नव्हते. ते एका नव्या भारताच्या निर्मितीचे आव्हान होते. बाबासाहेबांनी हे आव्हान विलक्षण बुद्धिमत्ता, अभ्यास, दूरदृष्टी आणि सामाजिक बांधिलकीने पेलले.

बाबासाहेबांसाठी स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय सत्तेपासून मुक्ती नव्हती. ज्याला जन्मामुळे माणूस म्हणूनही समान प्रतिष्ठा नाकारली जाते, त्याला समान हक्क मिळणे म्हणजे खरे स्वातंत्र्य, अशी त्यांची भूमिका होती. म्हणूनच राज्यघटनेच्या माध्यमातून त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांना भारतीय लोकशाहीचा आत्मा बनवले. मूलभूत अधिकार, कायद्यापुढील समानता, अस्पृश्यतेचे उच्चाटन, सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांच्या संरक्षणासाठीच्या तरतुदी आणि लोकशाही शासनव्यवस्थेची मजबूत चौकट, या सर्वांमागे बाबासाहेबांची परिवर्तनवादी दृष्टी होती. त्यांनी बहुसंख्याकांच्या सत्तेलाही संविधानाच्या मर्यादेत बांधले. कारण त्यांच्या दृष्टीने लोकशाही म्हणजे केवळ बहुमताचे राज्य नव्हे, तर प्रत्येक व्यक्तीच्या अधिकारांचा सन्मान करणारी व्यवस्था होय.

आज आपण २१व्या शतकातील आधुनिक भारताचे स्वप्न पाहतो. विज्ञान, तंत्रज्ञान, डिजिटल क्रांती आणि आर्थिक प्रगतीच्या युगात प्रवेश केला आहे. मात्र जातीय भेदभाव, सामाजिक विषमता, स्त्री-पुरुष असमानता, आर्थिक दरी आणि द्वेषाचे राजकारण आपल्यासमोर अजूनही प्रश्नचिन्ह बनून उभे आहे. अशा वेळी बाबासाहेबांची राज्यघटनात्मक मूल्ये अधिकच महत्त्वाची ठरतात. राज्यघटना आपल्याला अधिकार देते पण घटनात्मक मूल्ये आपल्याला जबाबदार नागरिक बनवतात, म्हणून राज्यघटनेचे रक्षण केवळ न्यायालये, संसद किंवा सरकारची जबाबदारी नाही तर ती प्रत्येक भारतीयाची सामूहिक जबाबदारी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून राज्यघटनेला आकार दिला पण त्याहून मोठे काम त्यांनी केले, ते म्हणजे भारतीय समाजाला माणूस म्हणून जगण्याचा घटनात्मक अधिकार दिला. त्यांची लेखणी थांबली, काळ पुढे गेला पण त्यांच्या विचारांचा प्रकाश आजही भारतीय लोकशाहीचा मार्ग उजळतो आहे.

बाबासाहेबांचे खरे स्मरण म्हणजे त्यांच्या पुतळ्याला हार नव्हे, तर त्यांच्या राज्यघटनेला मनापासून स्वीकारून प्रत्येक माणसाच्या स्वातंत्र्य, समता आणि सन्मानासाठी उभे राहणे होय. कारण राज्यघटना टिकली, तर लोकशाही टिकेल, लोकशाही टिकली, तर समता टिकेल आणि समता टिकली, तरच भारत खऱ्या अर्थाने महान बनेल!

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# ‘दीप अमावास्या’ आणि श्रावणात मांसाहार न करण्याचे महत्व

हिंदूंच्या सर्वाधिक कुचेष्टा आणि विकृत विनोद यांचे जे सण आहेत, त्यात वटपौर्णिमनंतर ‘दीप अमावास्या’ हा सण येतो. व्यक्तीगत पातळीवर ही अमावास्या साजरी करण्याचा प्रत्येकाला हक्क आहे; पण ‘दीपपूजेच्या ऐवजी केवळ गटारी म्हणून याला सर्वत्र कुप्रसिद्धी मिळू नये’, असे वाटते. आपण आपला धर्म, आपली संस्कृती, आपला सण यांचे का म्हणून विडंबन करायचे ? उलट महाराष्ट्रातील सर्व जातींच्या लाखो घरांमध्ये मोठ्या भक्तीभावाने या दिवशी दीपपूजन केले जाते.

त्यामुळे आपण आपल्या सणांचे विडंबन टाळायला हवे. आपल्याकडे आषाढी अमावास्येच्या नंतर आहारात पालट केला जातो. या दिवसाला ‘गताहारी (जो आहार गेला आहे तो) अमावास्या’ असेही म्हणतात. आपल्या प्रत्येक सणांची नावे संस्कृतवर आधारित आहेत. ’गटर’ हा इंग्रजी शब्द दीप अमावास्येला खोडसाळपणे जोडलेला आहे. ‘आपली लायकी गटारात लोळायची आहे’, असे आपल्याला हिणवले गेले आणि दुर्दैव हे आहे की, आपण ते खरे ठरवण्याच्या मागे लागलो आहोत. खरेतर आपण आपल्या महान हिंदु संस्कृतीची जाणीव ठेवायला हवी. आपल्या प्रत्येक सणाला विशेष महत्व आहे. आपल्या सणांची बरोबरी कुणीही करू शकत नाही. गत म्हणजे मागील, जुने, गेलेले, आता नाही ते.

आहार म्हणजे भोजन. गत+आहार = गताहार. जसे शाक + आहारी = शाकाहारी, तसे गत + आहारी = गताहारी. गत + आहारी + अमावास्या = गताहारी अमावास्या. या दिवशी दीपपूजन करतात. सहस्रो वर्षांची परंपरा असलेल्या आपल्या धर्मात याच्या मागचे विज्ञानही सामावलेले आहेच. पूर्वी या दिवशी मांसाहार करून गौरींच्या जेवणापर्यंत मांसाहार बंद ठेवला जात असे. बहुतेक प्राण्यांचा हा काळ म्हणजे प्रजननाचा काळ असतो. याच काळात प्राण्यांची हत्या केली, तर नवीन प्राणी जन्मालाच येणार नाहीत. मग वर्षभर खायला प्राणी मिळणार कुठून ? याचा सार्या निसर्गचक्रावरच विपरीत परिणाम होतो. त्यामुळे कोळी बांधव या काळात मासेमारी करत नाहीत आणि शासकीय पातळीवरूनही मासेमारीवर बंदी घालण्यात येते. या दिवसांत बाहेरच्या दमट वातावरणामुळे प्राण्यांच्या शरिराच्या आत आणि त्वचेवर अनेक घातक जीवजंतू असण्याची शक्यता असते. मांसाहारी पदार्थ शिजवतांना त्यांचा पूर्ण नाश न झाल्यास त्याचाही खाणार्याला त्रास होऊ शकतो.



मांस किंवा मासे नीट न ठेवल्यास वातावरणातील ओलावा आणि हवेतील वाढलेले जंतू यांमुळे त्यांच्या कुजण्याची प्रक्रिया अधिक वेगाने होते. आज विविध लसी, अत्यंत परिणामकारक प्रतिजैविके आणि औषधे उपलब्ध असूनही विविध संसर्गांना आवर घालणे कठीण झाले आहे. अनेक घातक रोगांच्या जीवघेण्या साथी या प्राण्यांच्या शरिरावर वाढणार्या जंतूंमुळे पसरतात; म्हणून या दिवसांत मांसाहार टाळल्यास जंतू संसर्गाचा धोका अल्प होतो. अत्यंत दुर्मिळ आणि प्रकृतीला पोषक अशा अनेक भाज्या याच काळात उगवतात. संपूर्ण वर्षभरात या भाज्या पुन्हा पहायलाही मिळत नाहीत. शाकाहार केल्यामुळे अशा भाज्या आपोआपच खाल्ल्या जातात. तुलनेने शाकाहाराचे या दिवसांत नीट पचन होते. विविध उपवासांच्या दिवशी खाल्ल्या जाणार्या कंदमुळांच्या आहारामुळे त्यातील अनेक दुर्मिळ खनिजे आणि उपयुक्त पोषक घटक आपोआप शरिराला लाभतात. कायम मांसाहार करणार्यांच्या पचनसंस्थेवर नेहमी येणारा ताण या शाकाहारी पालटांमुळे काही काळ कमी होतो.

अशा सर्व कारणांमुळे दीप अमावास्येला धार्मिक जोड दिल्यास आपोआपच निसर्गाचा तोल साधला जातो. त्यामुळे दीप अमावास्येची कुप्रसिद्धी टाळा आणि धार्मिक वृत्ती वाढवणारा श्रावण मास जरूर पाळा !

**– सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

## लीक

नेते भेटे एक दुजा
बातमी होते लीक
साधे पाणी पिताना
कशी बसली कीक

आपुलकीची बंधने
नाते असे भावनिक
परस्परविरोधी जरी
असू शके जवळीक

अचंबित होती सारे
कशी ही आगळीक
खाजगी आयुष्याला
का नसते मोकळीक

भिन्नपक्ष असे म्हणून
का करुनये सोयरिक
जीवनावरी वैयक्तिक
कॅमेरा नजरा बारीक

असू शकती कुणाचे
रे संबंधव्यावसायिक
घरातली नाती कुणी
का करी सामुदायिक

पाहवेना रे नतद्रष्टांना
सारेचालले ठाकठीक
बेकिंगन्यूज दाखवाय
किती करे झिकझीक

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# विंचूर येथे संत शिरोमणी नामदेव महाराज यांचा ६७६ वा संजीवन समाधी सोहळा उत्साहात संपन्न

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.११, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील विंचूर येथील श्री संत शिरोमणी नामदेव महाराज मंदिरात ६७६ वा संजीवन समाधी सोहळा अत्यंत भक्तिमय आणि उत्साही वातावरणात पार पडला. सलग सात दिवस अखंड हरिनाम सप्ताह, भजन, हरिपाठ, महाअभिषेक, काकड आरती, दिंडी सोहळा, दहीहंडी आणि महाप्रसाद भंडारा अशा विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांनी हा सोहळा संपन्न झाला. विशेष म्हणजे ह.भ.प. सुवर्णाताई जमदाडे यांच्या ज्ञानराज वारकरी संस्था बल्लेगाव (येवला) येथील ६० मुलांनी दिंडीत सहभाग नोंदवून दिंडीला विशेष रंगत आणली.

महाराष्ट्रातील संतांच्या मांदियाळीत संत नामदेवांचे स्थान अनन्यसाधारण आहे. आज सात शतकांनंतरही संत नामदेवांच्या टाळ-मृदुंगाचा आणि हरिनामाचा गजर महाराष्ट्रासह उत्तर भारतातही गुंजत आहे; हीच त्यांच्या अद्वितीय आणि अलौकिक कार्याची जागतिक ओळख आहे. १० ऑगस्ट रोजी त्यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त आयोजित या संजीवन समाधी सोहळ्याने संपूर्ण विंचूर नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली होती.

विंचूर शहर नामदेव शिंपी समाज बांधवांच्या वतीने आयोजित या सोहळ्याची सुरुवात ३ ऑगस्ट रोजी अखंड हरिनाम सप्ताहाने झाली. सप्ताहादरम्यान २४ तास अखंड विनावादन सुरू होते. दररोज दुपारी ४ ते ७ या वेळेत महिलांचे भजन, अभंग व गवळणींचा कार्यक्रम रंगला; ज्यात महिलांनी टाळ-मृदुंगाच्या तालावर तल्लीन होऊन नृत्य व भजन सेवा केली. सायंकाळी ७ ते ८ हरिपाठ आणि रात्री ९ वाजता विंचूर पंचक्रोशीतील नामवंत गायनाचार्यांचे सुश्राव्य भजन कार्यक्रम पार पडले.

महाअभिषेक, काल्याचे कीर्तन, दिंडी सोहळा आणि दहीहंडीने सप्ताहाची सांगता सोमवार (दि. १० ऑगस्ट) रोजी झाली. पहाटे ५ वाजता गुरुजी यांच्या पौरोहित्याखाली किरण नवले व त्यांच्या धर्मपत्नींच्या हस्ते महाअभिषेक पूजा संपन्न झाली. सकाळी ६ वाजता काकड आरती




व महाआरती झाली.

त्यानंतर सकाळी १० वाजता ’अनाथांची माय’ ह.भ.प. संगीतामाई गुंजाळ (अनाथ आश्रम, लासलगाव) यांचे काल्याचे कीर्तन झाले. त्यांनी आजच्या तरुण पिढीला समजेल अशा सोप्या आणि प्रासादिक भाषेत दृष्टांत देत उपस्थितांना भक्तीत मंत्रमुग्ध केले. दुपारी १२:३० वाजता संत नामदेव महाराज मंदिरात भव्य महाप्रसाद (भंडारा) पार पडला. सायंकाळी ६ वाजता संत नामदेव महाराजांच्या पालखीची व प्रतिमेची भव्य दिंडी काढण्यात आली. यात वारकरी, टाळकरी, शिंपी समाज बांधव, महिला आणि विंचूर ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या सोहळ्यात लासलगाव, येवला आणि विंचूर पंचक्रोशीतील भजनी मंडळांनी आपले सुश्राव्य भजन सादर करून संत नामदेव महाराजांच्या चरणी आपली सेवा अर्पण केली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समस्त शिंपी समाज बांधव, विंचूर पंचक्रोशीतील वारकरी, टाळकरी, वेणेकरी व भजनी मंडळांनी विशेष परिश्रम घेतले. दरवर्षीप्रमाणे यंदाही भाविकांनी दिलेल्या भरभरून प्रतिसादाबद्दल श्री संत नामदेव देवस्थान ट्रस्टच्या वतीने किरण नवले यांनी उपस्थितांचे व सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# ऐरोली-बेलापूर दरम्यानच्या रेल्वे स्थानकांचा होणार कायापालट

### केंद्रीय रेल्वेमंत्र्यांचे मध्य रेल्वे प्रशासनाला तातडीने विकास कामे करण्याचे निर्देश



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.११, नवी मुंबई :** नवी मुंबईतील ऐरोली ते बेलापूर दरम्यानच्या सर्व रेल्वे स्थानकांचा कायापालट करण्यासाठी विकासकामांना गती देण्याचे निर्देश केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी मध्य रेल्वे प्रशासनाला दिले आहेत. ठाणे लोकसभा मतदारसंघाचे खासदार नरेश म्हस्के यांनी नवी दिल्ली येथे रेल्वेमंत्र्यांची भेट घेऊन नवी मुंबईतील रेल्वे स्थानकांमधील समस्यांकडे त्यांचे लक्ष वेधले. त्यानंतर रेल्वेमंत्र्यांनी ही कामे तातडीने मार्गी लावण्याचे आदेश दिले. सिडकोच्या ताब्यात असलेली ऐरोली, रबाळे, घणसोली, कोपरखैरणे, तुर्भे, सानपाडा, जुईनगर, नेरुळ, सीवूड्स-दारावे आणि बेलापूर ही दहा रेल्वे स्थानके मे २०२६ मध्ये झालेल्या करारानुसार मध्य रेल्वे प्रशासनाकडे हस्तांतरित झाली आहेत. त्यामुळे या स्थानकांची देखभाल, दुरुस्ती आणि प्रवाशांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आता मध्य रेल्वेची आहे.मध्य रेल्वे आणि सिडको प्रशासनातील समन्वयाच्या अभावामुळे गेल्या काही वर्षांपासून नवी मुंबईतील रेल्वे प्रवाशांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत होते.

खासदार म्हस्के यांनी दोन्ही यंत्रणांमध्ये समन्वय घडवून आणण्यासाठी पुढाकार घेतला होता. त्यानंतर स्थानकांचे हस्तांतरण झाले.ऐरोली व रबाळे स्थानकांवरील बंद तिकीट खिडक्या, जीर्ण शौचालये, तुटलेल्या पायऱ्या व फरशा; घणसोली व कोपरखैरणे येथील अस्वच्छ तिकीट काउंटर; तुर्भे व सानपाडा येथील शौचालयांची अस्वच्छता, पिण्याच्या पाण्याची कमतरता व अपुरी प्रकाशयोजना; तसेच जुईनगर व नेरुळ येथील पादचारी पुलांची दुरवस्था आणि तिकीट खिडक्यांअभावी होणारी गर्दी या समस्या खासदार म्हस्के यांनी रेल्वेमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिल्या.सर्व स्थानकांवरील पायऱ्या, पादचारी पूल व प्रवाशांसाठीच्या बाकांची तातडीने दुरुस्ती करावी, शौचालयांचे नूतनीकरण करून २४ तास स्वच्छता व पाणीपुरवठा सुनिश्चित करावा, सर्व तिकीट खिडक्या नियमित सुरू ठेवाव्यात, स्थानक परिसरात पुरेशी प्रकाशयोजना व एलईडी दिवे बसवावेत, तसेच रात्रीच्या वेळी जीआरपी व आरपीएफची गस्त वाढवावी, अशा मागण्या खासदार म्हस्के यांनी केल्या. नवी मुंबईतील रेल्वे प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित, स्वच्छ आणि सुखकर करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील, अशी ग्वाही रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी खासदार नरेश म्हस्के यांना दिली.

# बोरी येथे बारानिमित्त दोन दिवशीय भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन

**अक्षराज : स्वप्निल जावळे**

**दि.११, खंडाळा (सातारा) :** बोरी तालुका खंडाळा जिल्हा सातारा येथे नागपंचमी च्या दुसऱ्या दिवशी पारंपारिक बोरीचा बार असतो त्यानिमित्त दि.१७ व १८ ऑगस्ट रोजी बोरी गावचे सुपुत्र व अमरदीप क्रीडा मंडळ बोरी या मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अमरज्योत आदर्श शिक्षक कै. अंकुश शंकर धायगुडे गुरुजी यांच्या आशीर्वादाने अमरदीप क्रीडा मंडळ बोरी यांच्या सौजन्याने बोरीच्या बारा निमित्त दोन दिवशीय भव्य दिव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोरी या ठिकाणी करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटक महाराष्ट्र राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री, पालकमंत्री बुलढाणा जिल्हा जननायक नामदार मकरंद आबा पाटील यांच्या शुभहस्ते होणार आहे.

या कबड्डी स्पर्धेसाठी ६० किलो वजनी गट व ७० किलो वजनी गट असे दोन गट असणार आहेत.६० किलो वजनी गट

प्रथम क्रमांकचे बक्षीस २१०३७ रू

ध्येयपूर्ती कंट्रक्शन खेड बुद्रुक प्रो.प्रा. अनिकेत बाबुराव धायगुडे यांच्याकडून,

व चषक

कै.किसन दादू धायगुडे यांच्या स्मरणार्थ भैरवनाथ कृषी सेवा केंद्र बोरी आप्पासो किसन धायगुडे यांच्याकडून द्वितीय क्रमांकचे बक्षीस रु - १५०३७ आणि चषक,

विद्या इंटरप्राईजेस सातारा निरंजन कदम यांच्याकडून

व चषक

श्रीदत्त कंट्रक्शन अंदोरी सोपान धायगुडे यांच्याकडून

तृतीय -१००३७ रू

शिव सह्याद्री कंट्रक्शन अंदोरी प्रोपा-संजय धायगुडे व चषक वक्रतुंड मेन्स वेअर प्रोप्रा.अभिजीत मधुकर साळुंखे यांच्याकडून चतुर्थ क्रमांक-७०३७

श्री दत्त चिले अर्थमूव्हर्स दादा शेळके व नंदिनी डेव्हलपर्स पुणे विनोद शेळके यांच्याकडून

व चषक श्री दत्तात्रेय ज्वेलर्स व कोकरे सराफ लोणंद शरद कोकरे यांच्याकडून ७० किलो वजनी गट प्रथम क्रमांक २१०३७

शिव उद्योग समूह

प्रोप्रा.सचिन विनायक धायगुडे

व चषक

कै मंगेश व महेश रामचंद्र धायगुडे यांच्या स्मरणार्थ,

चि.प्रथमेश व अविष्कार रामचंद्र धायगुडे यांच्याकडून,

द्वितीय क्रमांक १५०३७

कै.संतोष निवृत्ती वेळे यांच्या स्मरणार्थ निरंजन रोडलाईन्स कळंबोली यांच्याकडून

व चषक पठाण किराणा अँन्ड जनरल स्टोअर प्रोप्रा.रशीद पठाण यांच्याकडून तृतीय क्रमांक-१००३७

कै.गजानन देशमुख यांच्या स्मरणार्थ हनुमंत ज्वेलर्स लोणंद व खंडाळा चषक,भैरवनाथ दूध डेअरी सुखेड प्रोप्रा.राजेंद्र धायगुडे यांच्याकडून,चतुर्थ क्रमांक -७०३७

शिव ट्रेडर्स उडतरे प्रोप्रा.सौरभ संजय जगताप यांच्याकडून

व चषक चांद भाई पठाण यांच्या स्मरणार्थ सलीम चांदभाई पठाण यांच्याकडून,उत्कृष्ट खेळाडू स्व.स्वप्निल भैया नानासो धायगुडे यांच्या स्मरणार्थ अमोल पोपट धायगुडे फौजी यांच्याकडून करण्यात आले आहे तरी या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी श्री संदीप धुरगुडे गुरुजी

मो -९७६७२७००१७

व स्वप्निल धायगुडे -

९६५७१८०४८४

या नंबरवर संपर्क साधावा.असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या संवर्धनासाठी केंद्राचा विशेष निधी द्या

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, अहिल्यानगर :** महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाची साक्ष देणाऱ्या ऐतिहासिक किल्ल्यांचे संरक्षण, संवर्धन आणि पुनरुज्जीवन करण्यासाठी केंद्र सरकारने विशेष निधी उपलब्ध करून द्यावा. तसेच 'मराठा लष्करी भूदृश्य' या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झालेल्या महाराष्ट्रातील किल्ल्यांसाठी स्वतंत्र संवर्धन व पुनरुज्जीवन पॅकेज जाहीर करावे, अशी मागणी खासदार निलेश ज्ञानदेव लंके यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे.



## खासदार नीलेश लंके यांची पंतप्रधानांकडे मागणी

'मराठा लष्करी भूदृश्य' या ऐतिहासिक वारशाचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाल्याच्या पार्श्वभूमीवर खासदार लंके यांनी पंतप्रधानांना निवेदन देत महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या संवर्धनाचा मुद्दा गांभीर्याने मांडला आहे. महाराष्ट्रातील किल्ले हे केवळ पर्यटनस्थळे नसून छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा साम्राज्याच्या पराक्रमाची, दूरदृष्टीची आणि स्थापत्यकौशल्याची जिवंत साक्ष देणारा अमूल्य वारसा आहे. त्यामुळे या ऐतिहासिक ठेव्याचे जतन करणे ही शासनाची महत्त्वाची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

महाराष्ट्रातील अनेक किल्ल्यांकडे नियमित देखभाल व पुरेशा निधीअभावी दुर्लक्ष होत असून काही किल्ल्यांची तटबंदी, बुरुज, प्रवेशद्वारे, पाण्याच्या टाक्या आणि अन्य ऐतिहासिक वास्तू जीर्ण होत आहेत. काळाच्या ओघात या वास्तुंचे नुकसान वाढत असून वेळीच उपाययोजना न केल्यास ऐतिहासिक वारशाची अपरिमित हानी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे किल्ल्यांच्या संवर्धनासाठी केंद्र सरकारने स्वतंत्र आणि दीर्घकालीन आर्थिक तरतूद करावी, अशी मागणी लंके यांनी केली आहे.

महाराष्ट्रातील किल्ल्यांना जागतिक दर्जाच्या पर्यटनस्थळांचा दर्जा मिळवून दिल्यास राज्याच्या पर्यटन क्षेत्राला मोठी चालना मिळू शकते. देश - विदेशातील पर्यटक मोठ्या संख्येने किल्ल्यांना भेट देऊ शकतात. त्यातून स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण होऊन किल्ल्यांच्या परीसरातील गावांच्या अर्थव्यवस्थेला बळ मिळू शकते. त्यामुळे ऐतिहासिक वारशाचे जतन आणि पर्यटन विकास यांची सांगड घालणे आवश्यक आहे.

युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारशाचा सामावेश होणे ही राज्यासाठी अभिमानाची बाब आहे.

या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने महाराष्ट्रातील ऐतिहासिक किल्ल्यांच्या संवर्धनासाठी विशेष निधी उपलब्ध करून द्यावा आणि जागतिक वारसा म्हणून मान्यता मिळालेल्या किल्ल्यांसाठी स्वतंत्र संवर्धन व पुनरुज्जीवन पॅकेज जाहीर करावे, अशी ठोस मागणी खासदार निलेश लंके यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली.

# शिक्षकाच्या त्रासाला कंटाळून पोलीस भरतीचा सराव करणाऱ्या तरुणीनं आयुष्य संपवल

### पोलिस भरतीची करत होती तयारी, अकॅडमीत शिक्षकाकडून त्रास

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, अहिल्यानगर :** जिल्ह्यातील पारनेर तालुका एक मन हेलावणारी घटना समोर आली आहे. पोलीस दलात भरती होऊन स्वतःचं आणि कुटुंबाचं स्वप्न साकार करण्यासाठी मोठ्या जिद्दीने आणि मेहनतीने तयारी करणाऱ्या एका २५ वर्षीय तरुणीने आयुष्य संपवलं आहे. अकॅडमी शिक्षकाच्या छळाला कंटाळून या तरुणीनं खाकीचं स्वप्न अपूर्ण ठेवत आयुष्याचा दोर कापला आहे. ही घटना दिनांक १० ऑगस्ट रोजी आळेफाटा येथे घडली असून भाग्यश्री भास्कर भंडारी असे मयत तरुणीचे नाव आहे. याप्रकरणी सह्याद्री अकॅडमीचा शिक्षक मयुर अशोक डुंबरे (रा.खामुंडी, ता.जुन्नर) याच्याविरुद्ध आळेफाटा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



भाग्यश्री भंडारी ही मूळची आळकुटी (ता.पारनेर) येथील रहिवासी असून, आळेफाटा येथे राहून पोलीस भरतीचा सराव करत होती. काही दिवसांपूर्वी झालेल्या एका प्रसंगात शिक्षक मयुर डुंबरे याला पोलीस ठाण्यात जावे लागले होते. याच गोष्टीचा राग मनात धरून डुंबरे याने भाग्यश्री हिला टार्गेट करण्यास सुरुवात केली. वर्गात तसेच इतर विद्यार्थ्यांसमोर सतत अपमानास्पद वागणूक देणे आणि तिचा मानसिक छळ करणे सुरू होते. या रोजच्याच त्रासाला कंटाळून अखेर भाग्यश्रीने राहत्या खोलीत गळफास घेत आत्महत्या केली. मयत भाग्यश्रीची बहीण शितल भंडारी ही स्वतः शासकीय सेवेत कार्यरत आहे. आपल्या बहिणीवर ओढावला हा प्रसंग पाहून त्यांनी तात्काळ कायदेशीर पावले उचलत आळेफाटा पोलिसांत फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून आरोपी शिक्षक मयुर डुंबरे याच्यावर भारतीय न्याय संहिता इछड २०२३ च्या कलम १०८ (आत्महत्येस प्रवृत्त करणे) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला असून, त्याला अटकेची प्रक्रिया सुरू आहे.

**अकॅडमीच्या कार्यशैलीवर पेटला संताप..!**

ग्रामीण भागातील हजारो तरुण - तरुणी आपले भविष्य घडविण्यासाठी आळेफाटा परिसरातील खाजगी अकॅडमींमध्ये दाखल होतात. मात्र, शिस्तीच्या गोंडस नावाखाली चालणारा मानसिक छळ आणि शिक्षकांची अरेरावी या घटनेमुळे उघडी पडली आहे. विद्यार्थ्यांना घडवणाऱ्या अकॅडमीच जर मुलांच्या जीवाशी उठणार असतील, तर पालकांनी आपल्या मुलांचा विश्वास कोणावर ठेवावा? या घटनेनंतर आळेफाटा परिसरातील अशा खाजगी अकॅडमींवर प्रशासनाने कडक नियमावली आणि अंकुश ठेवावा, अशी तीव्र मागणी आता पालकांमधून केली जात आहे.

# १३ ऑगस्टपासून अन्न-पाणी त्याग आंदोलनाचा इशारा

### कोक येथील वित्त आयोगाच्या कामातील अनियमिततेची चौकशी रखडली; चौकशी अहवाल सादर होऊन ४ महिने

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.११, जिंतूर (परभणी) :** तालुक्यातील मौजे कोक येथील वित्त आयोगाच्या कामातील अनियमितता, दूषित पाण्यामुळे घडलेली घटना तसेच घरकुल प्रकरणातील कथित अनियमितता याबाबत चौकशी होऊन अहवाल सादर करण्यात आला असतानाही संबंधित दोषींवर अद्याप कारवाई करण्यात आलेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याप्रकरणी अखिल भारतीय युवा फेडरेशनचे तालुकाध्यक्ष शेख नदिम शेख कलीम यांनी जिल्हा प्रशासनाकडे निवेदन देत चौकशी अहवालाची प्रत देण्याची व दोषींवर तातडीने प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.निवेदनात नमूद केल्यानुसार, कोक येथील संबंधित प्रकरणाबाबत गेल्या वर्षभरापासून संबंधित कार्यालयांकडे अर्ज व तक्रारी सादर करण्यात आल्या आहेत. त्यानंतर चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवाल सादर होऊन सुमारे ४ महिने उलटले आहेत. मात्र, अद्याप संबंधितांवर कोणतीही ठोस प्रशासकीय अथवा कायदेशीर कारवाई करण्यात आलेली नसल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. तसेच चौकशी अहवालाची प्रत अर्जदारास देण्यात आलेली नसल्याने या संपूर्ण प्रकरणाच्या पारदर्शकतेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

संबंधित अर्जदाराने तत्कालीन ग्रामसेवक, संबंधित अभियंता, सरपंच व उपसरपंच यांच्या भूमिकेबाबत गंभीर तक्रारी व पुरावे सादर केले असल्याचे निवेदनात म्हटले आहे.दरम्यान, संबंधित व्यक्तींचे काही राजकीय व्यक्तींशी जवळचे संबंध असल्याने राजकीय दबावामुळे प्रशासनाकडून कारवाई केली जात नसल्याचा संशय अर्जदाराने व्यक्त केला आहे. हा आरोप असून त्याबाबत प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

अहवालाची प्रमाणित प्रत देण्याची मागणीचौकशी अहवाल तयार होऊन ४ महिन्यांचा कालावधी उलटला असतानाही कारवाई न झाल्याने अर्जदाराने नाराजी व्यक्त केली आहे.

चौकशी अहवालाची प्रमाणित प्रत अर्जदारास उपलब्ध करून द्यावी, दोषींवर नियमाप्रमाणे तातडीने प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करावी आणि करण्यात आलेल्या कारवाईची लेखी माहिती द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

**मागण्या मान्य न झाल्यास अन्न-पाणी त्याग आंदोलन**

या प्रकरणात तातडीने कारवाई न झाल्यास १३ ऑगस्ट २०२६ पासून परभणी येथील आंदोलन मैदानात बेमुदत अन्न व पाणी त्याग उपोषण सुरू करण्याचा इशारा शेख नदिम शेख कलीम यांनी दिला आहे. याबाबतचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद परभणी तसेच संबंधित प्रशासकीय व पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे.आता प्रशासन चौकशी अहवालावर काय निर्णय घेते आणि कोक येथील या प्रकरणात संबंधितांवर कारवाई होते का, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# खा.धानोरकर यांच्या हस्ते आयुष्यमान व आयुष्यमान वय वंदना कार्डांचे वाटप

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपूर :** दिवंगत खासदार बाळूभाऊ धानोरकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून चंद्रपूर येथे आयोजित विशेष नोंदणी शिबिरादरम्यान पात्र नागरिक आणि ज्येष्ठ नागरिकांना आयुष्यमान भारत- महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतंर्गत ' आयुणमान कार्ड' व 'आयुष्यमान वय वंदना कार्ड' चे वाटप खा. प्रतिभा धानोरकर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

या योजनेमुळे गरजू नागरिक तसेच ज्येष्ठ नागरिकांना प्रतिवर्ष ५ लाख रुपयांपर्यंत मोफत आणि दर्जेदार वैद्यकीय उपचार मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे. 'आरोग्य सेवा सर्वसामान्यांच्या थेट दारापर्यंत पोहोचवणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे. दिवंगत



बाळूभाऊंचे सेवेचे स्वप्न पुढे नेण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून, नागरिकांनी या योजनेचा लाभ घेऊन आपले व कुटुंबाचे आरोग्य सुरक्षित करावे, ' असे भावनिक आवाहन खा. प्रतिभा धानोरकर यांनी याप्रसंगी केले.

या कार्यक्रमास कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार सुभाष धोटे, कॉंग्रेस गटनेते नगरसेवक सुरेंद्र अडबाले, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष सोहेल रजा शेख, महिला व बालकल्याण सभापती संगीता भोयर, झोन सभापती रामनरेश यादव, महिला व बालकल्याण उपसभापती सईदा बेगम ताजु शेख, माजी महापौर तथा नगरसेविका संगीता अमृतकर, नगरसेवक राहुल घोटेकर, नगरसेवक सुनील खंडेलवार, नगरसेवक अजय बल्की, नगरसेवक राहुल चौधरी, नगरसेविका महानंदा वाळके, नगरसेविका वैशाली महाडोळे, नगरसेविका शीला सिडाम, नगरसेविका करुणा चालखुरे, यांच्यासह कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी. कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुजित झावरे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे पारनेर शहराच्या विकासाला मिळणार नवी गती

## पारनेर शहराच्या विकास आराखड्याचे नोटिफिकेशन येत्या आठवड्यात

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नगरविकास विभागाला तातडीचे निर्देश



पारनेर शहराचा नियोजनबद्ध आणि सर्वांगीण विकास व्हावा,ही आमची सातत्याने भूमिका राहिली आहे. विकास आराखड्याला मंजुरी मंजुरी मिळाल्यानंतर केवळ तांत्रिक कारणांमुळे त्याचे अंतिम नोटिफिकेशन प्रलंबित होते. त्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी केली. त्यांनी तत्काळ नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांसोबत बैठक घेऊन येत्या आठवड्यात नोटिफिकेशन प्रसिद्ध करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे पारनेरच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. उपमुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या शब्दामुळे आता शहराचा कायापालट होणार आहे.

**- सुजित झावरे पाटील (जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष)**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचा असलेला विकास आराखडा अर्थात DPR आता प्रत्यक्षात उतरणार आहे. सुजित झावरे पाटील आणि अनिलराव शिंदे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येत्या आठवड्यात या आराखड्याचे अंतिम नोटिफिकेशन प्रसिद्ध करण्याचे स्पष्ट आदेश नगरविकास विभागाला दिले आहेत. पारनेरच्या विकासासाठी गेल्या अनेक महिन्यांपासून सुजित झावरे पाटील यांनी सातत्याने प्रयत्न केले. तांत्रिक कारणांमुळे रखडलेल्या विकास आराखड्यातच्या नोटिफिकेशनसाठी त्यांनी आज मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची अनिलराव शिंदे यांच्यासह प्रत्यक्ष भेट घेतली.

पारनेरच्या विकासाला आता आणखी विलंब नको. नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी DPR चे नोटिफिकेशन त्वरित प्रसिद्ध करा अशी आग्रही मागणी त्यांनी केली. झावरे पाटील यांची मागणी ऐकून घेत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता यांच्यासोबत तातडीची बैठक घेतली.

पारनेर शहराचा पायाभूत विकास प्राधान्याने करणे आवश्यक आहे. येत्या आठवड्यात ृझठ चे नोटिफिकेशन प्रसिद्ध झाले पाहिजे. शहरातील अंतर्गत रस्ते रुंदीकरण, नवीन रस्ते आणि डांबरीकरण २४७ पाणीपुरवठा योजना आणि पाणी साठवणूक क्षमता वाढ अत्याधुनिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आणि नवीन ड्रेनेज लाईन सुशोभीकरण, बाजारपेठ विकास, उद्याने आणि सार्वजनिक स्वच्छता झावरे पाटील यांच्या या पाठपुराव्यामुळे पारनेर शहराच्या पुढील २० वर्षांच्या विकासाचा आराखडा निश्चित झाला आहे. यामुळे नागरिकांमध्ये समाधान आणि आशेचे वातावरण आहे.

# आदिवासी दिन एका दिवसाचा उत्सव नव्हे; ३६५ दिवस समाजाच्या प्रगतीसाठी कार्यर करण्याची प्रेरणा देणारा संकल्पदिन - आ.मुनगंटीवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, पोंभूर्णा (चंद्रपूर) :** जागतिक आदिवासी दिन हा केवळ एका दिवसाचा उत्सव न राहता, आदिवासी समाजाच्या प्रगतीसाठी वर्षभर चिंतन, मंथन आणि प्रत्यक्ष कार्य करण्याची प्रेरणा देणारा दिवस ठरला पाहिजे, असे प्रतिपादन आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केले. आदिवासी समाजाच्या हक्कांचे संरक्षण, त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक आणि सर्वांगीण विकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज असून, समाजाच्या प्रगतीसाठी ३६५ दिवस काम करण्याचा संकल्प हीच जागतिक आदिवासी दिनाची खरी भावना असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जागतिक आदिवासी दिनानिमित्त पोंभुर्णा येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमास भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.अशोक जीवतोडे, तहसीलदार मोहनीश शेलवटकर, नगराध्यक्षा सुलभा पिपरे, उपनगराध्यक्ष अजित मंगळगिरीवार, भाजपा तालुका अध्यक्ष हरीश ढवस, गोंडवाना आंदोलन आदिवासी चळवळीचे शाखाप्रमुख जगन येलके, पांडुरंग जुमनाके, विजय तोडासे, ज्योतिराव गावडे, भाजपा जिल्हा ग्रामीण उपाध्यक्ष ज्योती वेलके, राहुल संतोषवार, गुणाकार जुमनाके, गीताताई कोवे, कांताबाई मडावी, श्रीहरी सिडाम, ऋषी कोटणाके, ज्योती बुरांडे, गजानन इस्टाम, रमेश वेलादी यांच्यासह मोठ्या संख्येने आदिवासी समाजबांधव उपस्थित होते.

जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी बंधू-भगिनींना शुभेच्छा देताना आ. मुनगंटीवार म्हणाले की, आजचा दिवस केवळ जागतिक आदिवासी दिन नसून क्रांती दिवसही आहे. १९४२ मध्ये गवालिया टँक मैदानावर 'चले जाव'चा मंत्र देत स्वातंत्र्यलढ्याला निर्णायक दिशा देण्यात आली. त्याचप्रमाणे जागतिक आदिवासी दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा दिवस नसून उर्वरित ३६४ दिवस आदिवासी समाजाच्या प्रगतीसाठी, उन्नतीसाठी आणि त्यांच्या प्रश्नांच्या निराकरणासाठी चिंतन-मंथन करण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे.

आदिवासी समाज हा प्रामाणिक, सात्त्विक, परिश्रमी आणि कष्टकरी असून निसर्गाशी त्याचे अतूट नाते आहे. आदिवासी समाजाने निसर्गामध्ये आनंद आणि समाधान शोधले आहे. आज निसर्गाचे रक्षण करणारा समूह कमी होत असताना नंदुरबार, गडचिरोली, चंद्रपूर आणि यवतमाळ यांसारख्या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर जंगल टिकून राहण्यामागे आदिवासी समाजाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. मानवी गरजांना अंत नसतो; गरजा वाढतच जातात, मात्र संयम आणि समाधानाची भावना जपणे हीच खरी समृद्धी आहे. संयमाने निसर्गाचा आणि उपलब्ध साधन संपत्तीचा उपभोग घेणारा समाजच खऱ्या अर्थाने मानवतेचे रक्षण करतो, असेही आ. मुनगंटीवार यांनी सांगितले.



देशाच्या सर्वोच्च संवैधानिक पदावर प्रथमच आदिवासी समाजातील भगिनी महामहिम राष्ट्रपती द्रौपदीजी मुर्मू विराजमान झाल्यानंतर देशातील आदिवासी समाजामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे. मेहनत, जिद्द आणि प्रामाणिक प्रयत्नांच्या बळावर आपणही देशाच्या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचू शकतो, हा आत्मविश्वास प्रत्येक आदिवासी बांधवाच्या मनात निर्माण व्हावा, हाच त्यामागचा खरा उद्देश असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी नमूद केले.

**वनहक्क पट्ट्यांचे वितरण**

जागतिक आदिवासी दिनाच्या कार्यक्रमादरम्यान पोंभुर्णा येथे वनहक्क कायद्यान्वये पात्र लाभार्थ्यांना आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते वनहक्क पट्ट्यांचे वितरण करण्यात आले. यावेळी दिवाकर आत्राम, सुरेश कोवे, प्रभाकर कोवे, एकनाथ कोवे, आनंदराव कोवे, नागेंद्र कोवे, पत्रु घोडाम, सोमनाथ पेदोर, संतोष मडावी, सदाशिव मडावी, विनायक आत्राम, साईनाथ वेलादी, श्रीकांत तलांडे, भालचंद्र कन्नाके, धर्मेंद्र मेश्राम आदी पात्र लाभार्थ्यांना वनहक्क पट्टे प्रदान करण्यात आले.

**गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार**

यावेळी सोनल सोयाम, साहिल शेडमाके, आम्रपाली तोरे, आदित्य शेडमाके आणि रुपेश मडावी या गुणवंत विद्यार्थ्यांचा आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# संपूर्ण विदर्भ नशामुक्त करण्यासाठी युवकांनी संकल्प करावा - डॉ.जीवतोडे

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपूर :** चंद्रपूरसह संपूर्ण विदर्भ नशामुक्त करण्यासाठी युवकांनी पुढाकार घेतला पाहिजे. व्यसन ही केवळ व्यक्तीची समस्या नसून त्याचे दुष्परिणाम कुटुंब, समाज आणि राष्ट्राच्या भवितव्यावर होत असतात. त्यामुळे युवकांनी व्यसनांपासून दूर राहून आपल्या सहकाऱ्यांनाही नशामुक्त जीवन जगण्यासाठी प्रेरित करावे. निरोगी, सक्षम आणि संस्कारक्षम युवा पिढी घडविण्यातूनच विकसित भारताचे स्वप्न साकार होईल, तसेच नशाविरोधी जनजागृतीची चळवळ घराघरांपर्यंत पोहोचवावी, असे प्रतिपादन जनता महाविद्यालयाचे सचिव डॉ. अशोक जीवतोडे यांनी केले.

स्थानिक जनता महाविद्यालयाच्या पटांगणावर आयोजित '१० कोटी नशामुक्ती प्रतिज्ञा महाअभियान-२०२६' कार्यक्रमात ते बोलत होते. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, चंद्रपूर केंद्राच्या वतीने देशभर राबविण्यात येत असलेल्या या महाभियानांतर्गत जनजागृती व सामूहिक प्रतिज्ञा कारक्रमाचे आयोजन ८ ऑगस्ट २०२६ रोजी जनता महाविद्यालयात करण्यात आले.

संस्थेचे सचिव डॉ.अशोक जीवतोडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना च्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला. बह्माकुमारी संस्थेने भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयासोबत' नशामुक्त भारत अभियान ' अंतर्गत सामंजस्य करार केला आहे.

या माध्यमातून देशभरात विविध नशाविरोधी जनजागृती उपक्रम राबविले जात आहेत. ६ ते २० ऑगस्ट २०२६ या कालावधीत विशेष अभियान राबविण्यात येत असून, आंतरराष्ट्रीय युवा दिन आणि स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर युवकांमध्ये व्यसनमुक्ती, साकारात्मक जीवनमुल्ये आणि राष्ट्रनिर्मितीची भावना रुजविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या अभियानाच्या टप्प्यातील पहिला कार्यक्रम जनता महाविद्यालयात उत्साहात पार पडला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना व्यसनाचे शारिरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम याबाबत मार्गदर्शन प्रजापिता ब्रम्हाकुमारी विश्व विद्यालयाच्या कुंदादिदी यांच्यातर्फे करण्यात आले. व्यसनमुक्त जीवनशैलीचे महत्व पटवून देत



विद्यार्थ्यांकडून ' नशामुक्त भारत प्रतिज्ञा' घेण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी व युवकांनी सामूहिक शपथ घेत नशामुक्त समाजनिर्मितीचा संकल्प केला.

या उपक्रमाबद्दल ब्रम्हाकुमारी मेडिकल विंगतर्फे जनता महाविद्यालयाला सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. व्यसनमुक्त, निरोगी आणि जबाबदार समाज घडविण्यासाठी युवकांची भूमिका महत्वपूर्ण असून नशामुक्त भारताच्या दिशेने 'विकसित भारताकडे एक सक्षम पाऊल' म्हणून या अभियानाकडे पाहिले जात आहे.

याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्ष डॉ.प्रतिभा जीवतोडे, सचिव डॉ. अशोक जीवतोडे, ब्रम्हाकुमारीजच्या प्रमुख केंद्र संचालिका बी.के.कुंदा, रेणू दीदी, हर्षाली दीदी, महादेव भाई, मुकेश भाई, प्राचार्य डॉ. आशिष महातळे, प्राचार्य देवेंद्र भगत, रवी देवाळकर, यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या

### श्री संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त कौसडीत रक्तदान शिबिर



**अक्षराज : जफर शेख**

**दि.११, बोरी (परभणी) :** जिंतूर तालुक्यातील बोरी जवळ असलेल्या कौसडी येथे श्री संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त माळी समाज बांधवांच्या वतीने गणपती मंदिर परिसरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यात निर्माण होणारा रक्ताचा तुटवडा लक्षात घेऊन गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, या सामाजिक भावनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. रक्तदान शिबिराला ग्रामस्थ तसेच समाजबांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदान केले. रक्तदान हेच श्रेष्ठ दान या भावनेतून अनेक रक्तदाते पुढे आले. एका व्यक्तीने केलेले रक्तदान एखाद्या गरजू रुग्णासाठी जीवनदायी ठरू शकते. त्यामुळे समाजातील अधिकाधिक नागरिकांनी रक्तदानासाठी पुढे येण्याची गरज असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.शिबिरामध्ये माजी सरपंच लिंबाजीराव इखे, माजी चेअरमन तातेराव बारवकर, पंचायत समिती सदस्य मुजाहेद कादरी, ग्रामपंचायत सदस्य प्रभाकर इखे, नाथा इखे, तुळशीराम सावळे, पोलीस पाटील संभाजी इखे, रामू इखे, शंकर इखे यांच्यासह माळी समाज बांधव व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या रक्तदान शिबिरामध्ये मातोश्री रक्तपेढीचे संचालक ज्ञानेश्वर कटिंग व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी रक्तसंकलनाचे काम केले. रक्तदात्यांची आवश्यक तपासणी करून सुरक्षित पद्धतीने रक्त संकलित करण्यात आले.

श्री संत सावता महाराज यांनी समाजाला श्रम, सेवा आणि समतेचा संदेश दिला. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त धार्मिक कार्यक्रमासोबतच रक्तदानासारखा जीवनदायी सामाजिक उपक्रम राबवून त्यांच्या विचारांना कृतीची जोड देण्यात आली, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.दरम्यान, आजच्या काळात अपघातग्रस्त, प्रसूतीतील माता, शस्त्रक्रिया तसेच विविध आजारांवरील उपचार घेत असलेल्या रुग्णांना अनेकदा तातडीने रक्ताची गरज भासते. अशा वेळी रक्तपेढ्यांमध्ये पुरेसा रक्तसाठा असणे अत्यंत आवश्यक आहे. रक्त कृत्रिमरीत्या तयार करता येत नसल्याने निरोगी नागरिकांनी नियमित रक्तदान करून या सामाजिक कार्यात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले.कौसडी येथे आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरातून आपले काही मिनिटांचे रक्तदान एखाद्याला नवजीवन देऊ शकते हा महत्त्वपूर्ण सामाजिक संदेश देण्यात आला. भविष्यातही अशाच प्रकारचे सामाजिक उपक्रम सातत्याने राबविण्याचा निर्धार समाजबांधवांनी व्यक्त केला.

### २ वर्षांच्या गाईचा, बिबट्याच्या हल्लयात मृत्यू

#### शासनाने त्वरित भरपाई देण्याची बाधित शेतकऱ्याची आर्त हाक



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.११, विंचूर (नाशिक) :** विंचूर - विठ्ठलवाडी - कोटमगाव रोडलगत असलेल्या वस्तीवर बिबट्या या हिंस्त्र जंगली प्राण्याने दहशत निर्माण केली असून दिनांक १० ऑगस्ट रोजी पहाटे ५ वाजेच्या सुमारास स्थानिक शेतकरी मोहन शंकरराव पवार यांच्या गोठ्यात घुसून बिबट्याने २ वर्षे वयाच्या लहान गाईवर हल्ला करत तिला जागीच ठार केले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे सावट पसरले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, नेहमीप्रमाणे पहाटेच्या सुमारास पवार कुटूंबिय झोपेत असताना बिबट्याने गोठ्यात प्रवेश केला आणि थेट गाईवर हल्ला चढवला. गाईचा ओरडण्याचा आवाज आल्याने मोहन पवार व त्यांच्या कुटुंबाने गोठ्याकडे धाव घेतली, मात्र तोपर्यंत बिबट्याने गाईचा गळा आवळून तिला ठार केले होते. मानवी वावर जाणवताच बिबट्याने तेथून शेतात पळ काढला.

विशेष म्हणजे, याच जागेवर वर्षभरापूर्वी बिबट्याने मोहन पवार यांच्या पाळीव कुत्र्यावर हल्ला करून त्याला ठार केले होते. वर्षभरात दुसऱ्यांदा बिबट्याने याच वस्तीवर हल्ला केल्यामुळे पवार कुटुंबासह परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ प्रचंड दहशतीखाली आले आहेत. रात्रीच्या वेळी शेतात पाणी देणे तसेच गुरांना सांभाळणे अवघड झाले असून, वन विभागाने तात्काळ या भागात पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी होत आहे. आधीच अस्मानी आणि सुलतानी संकटांनी खचलेल्या सामान्य शेतकऱ्याचे या हल्लयामुळे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. माझ्या लहान गाईचा बिबट्याच्या हल्लयात नाहक बळी गेला असून, प्रशासनाने आणि शासनाने माझ्या झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून तात्काळ योग्य ती नुकसान भरपाई द्यावी, अशी आर्त हाक बाधित शेतकरी मोहन पवार यांनी केली आहे. वन विभागाने या घटनेची दखल घेऊन परिसरात गस्त वाढवावी आणि शेतकऱ्यांचे प्राण व पशुधन सुरक्षित करावे, अशी मागणी विंचूर व कोटमगाव परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे.

### विश्व आदिवासी गौरव दिनानिमित्त शिरपूर वीर एकलव्य यांना अभिवादन



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.११, धुळे :** जागतिक आदिवासी दिनानिमित्त शिरपुर शहरातील खंडेराव मंदिर चौक येथे वीर एकलव्य महाराज यांच्या स्मारकास माल्या-अर्पण करत अभिवादन करण्यात आले. यावेळी धुळे भाजपा जिल्हा सरचिटणीस अरुण धोबी, हिंगोणी सरपंच सोमा भिल, भाजपा भटके विमुक्त आघाडी प्रदेश उपाध्यक्ष रविंद्र भोई, शिरपुर भाजपा शहर सरचिटणीस महेंद्र पाटील, शहर चिटणीस राधेश्याम भोई सह आदी उपस्थिती होते.

पाणी, जंगल आणि जमिनीचे शतकानुशतके रक्षण करणाऱ्या सर्व आदिवासी बांधवांना जागतिक आदिवासी दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा. जल, जंगल आणि जमिनीशी घट्ट जोडलेल्या आदिवासी समाजाने आपली अनोखी संस्कृती नेहमी जपून ठेवली आहे. निसर्गाचा आदर करत जगण्याची त्यांची जीवनशैली आज संपूर्ण जगासाठी एक आदर्श आहे. आदिवासी बांधवांच्या लोककला, भाषा आणि परंपरेने आपल्या देशाचा वारसा अधिक समृद्ध केला आहे. त्यांचे हे प्रेम आणि निसर्गाशी असलेले नाते आपल्या सर्वांना निसर्गावर प्रेम करण्याची शिकवण देते.